असा. क्र. १६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, नोव्हेंबर १८, २००५/कार्तिक २७, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ ऑक्टोबर २००५

अधिसूचना

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.**

क्रमांक आरटीआय. २००५/सी.आर. ३१५/०५/५.—माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या कलम २७ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**— (१) या नियमांना महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २००५ असे म्हणावे. (२) ते, दिनांक १२ ऑक्टोबर २००५ रोजी अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२), असा आहे ;

(ख) "कलम" याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(ग) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील ;

३. **माहिती मिळविण्याची कार्यपद्धती.**—कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती मिळविण्यासाठीचा विनंती अर्ज, संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे साध्या कागदावर जोडपत्र (अ) मध्ये दिलेल्या नमुन्यात करण्यात येईल, आणि त्यासोबत सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली रुपये दहा इतकी अर्ज फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा बँकेच्या धनादेशाद्वारे जोडण्यात येईल किंवा त्यावर दहा रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

४. **माहितीबद्दलची फी.**—(१) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात किंवा मनी ऑर्डरच्या स्वरूपात पुढील दरांनी आकारण्यात येईल :—

| | |
|---|---|
| (अ) (क) संबंधित विभागाने विशिष्ट दस्तऐवज, नकाशे इत्यादींची किंमत अगोदरच निश्चित केली असेल त्याबाबतीत, | अशी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च. |
| (ख) माहिती छायांकित प्रतींच्या स्वरूपात किंवा अन्य (प्रतींच्या) स्वरूपात घटकन मिळण्याजोगी असेल त्याबाबतीत. | (एक) तयार केलेल्या किंवा छायांकित केलेल्या प्रत्येक पृष्ठासाठी (ए-४ किंवा ए-३ आकारातील कागद) दोन रुपये अधिक टपाल खर्च, किंवा<br>(दोन) मोठ्या आकारातील कागदाच्या प्रतीचा प्रत्यक्ष आकार किंवा परिव्यय किंमत अधिक टपाल खर्च. |

(ब) अभिलेख पाहण्यासाठी, पहिल्या तासाकरिता कोणतीही फी नाही, आणि त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटांकरिता (किंवा त्याच्या भागाकरिता) रुपये पाच इतकी फी :

परंतु, अर्जदार व्यक्तिशः येऊन माहिती घेऊन जाईल. त्याबाबतीत कोणताही टपाल खर्च आकारण्यात येणार नाही.

(२) कलम ७ च्या पोट-कलम (५) अन्वये माहिती पुरविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात किंवा मनी ऑर्डरच्या स्वरूपात पुढील दरांनी आकारण्यात येईल :—

(क) डिस्केटस् किंवा फ्लॉपी या स्वरूपातील माहिती पुरविण्यासाठी प्रत्येक डिस्केटस् किंवा फ्लॉपीकरिता पन्नास रुपये अधिक टपाल खर्च ; आणि

(ख) मुद्रित स्वरूपातील माहिती पुरविण्यासाठी, अशा प्रकाशनासाठी निश्चित केलेली किंमत किंवा त्या प्रकाशनातील उताऱ्यांच्या प्रत्येक छापांकित पृष्ठासाठी दोन रुपये अधिक टपाल खर्च :

परंतु अर्जदार व्यक्तिशः येऊन माहिती घेऊन जाईल त्याबाबतीत, कोणताही टपाल खर्च आकारण्यात येणार नाही.

५. **अपील.**–(१) कलम ७ च्या पोट-कलम (१), किंवा पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत निर्णय मिळाला नसेल अशा किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या, कोणत्याही व्यक्तीस, राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित अपील प्राधिकाऱ्याकडे साध्या कागदावर जोडपत्र " ब " मध्ये दिलेल्या नमुन्यात अपील दाखल करता येईल. अशा अपिलासोबत, ज्या विरुद्ध अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाच्या एका प्रतीसह सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली रुपये वीस इतकी अपील फी, रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात देण्यात येईल किंवा त्यावर वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

(२) कलम १९ च्या पोट-कलम (१) खालील अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या अपील प्राधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे साध्या कागदावर जोडपत्र " क " मध्ये दिलेल्या नमुन्यात दुसरे अपील दाखल करता येईल. अशा अपीलासोबत, ज्या विरुद्ध अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाच्या एका प्रतीसह, राज्य माहिती आयोगाला देय असलेली रुपये वीस इतकी अपील फी रोख रकमेच्या स्वरूपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरूपात देण्यात येईल किंवा त्यावर वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

जोडपत्र - अ
(नियम ३ पहा)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रति,**
मा. जन. माहिती अधिकारी,
____________________
____________________

येथे १० रुपयांचा
कोर्ट फी स्टॅम्प लावावा.

**१) अर्जदाराचे पूर्ण नाव** :- ____________________

**२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता** :- ____________________
____________________

**फोन नंबर/मोबाईल नंबर -** ________________

**३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :-**

(एक) **माहितीचा विषय * :-**

(दोन) **माहितीचा कालावधी # :-**

(तीन) **आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन $ :-**

१)

२)

३)

४)

(चार) **माहिती टपालाने किंवा व्यक्तिशः** :-

(पाच) **जर टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे.** (साध्या, नोंदणीकृत किंवा शीघ्र डाकने)

**४) अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे** :-

**ठिकाण :-**

**दिनांक :-** / /२००

**अर्जदाराची सही**

( )

---

* विषय ठळक स्वरुपात दर्शविण्यात यावा. (जसे. शासकीय जमिन देणे/सेवाविषयक बाब/लायसेन्स, इत्यादी).

\# ज्या कालावधीची माहिती आवश्यक असेल तो संबंध कालावधी दर्शविण्यात यावा.

$ आवश्यक असलेल्या माहितीचा विशेष तपशील दर्शविण्यात यावा.

जोडपत्र ब

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ याच्या कलम १९ (१) अन्वये अपील (प्रथम)

प्रेषक,

____________________

____________________

____________________

येथे रु. २०/- चा कोर्ट फी स्टँप लावा

प्रति,

____________________

____________________

____________________

१) अपिलकाराचे पूर्ण नांव -

२) अपिलकाराचा पूर्ण पत्ता -
फोन / मोबाईल नं. -

३) राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्याचा तपशिल -

४) ज्या आदेशाविरुध्द अपील केले असेल तो आदेश प्राप्त झाल्याची तारीख -
(आदेश दिलेला असेल तर)

५) अपील दाखल करण्याची शेवटची तारीख -

६) अपिलाची कारणे -

७) माहितीचा तपशिल -

(एक) आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप व विषय -

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित आहे त्या कार्यालयाचे किंवा विभागाचे नांव -

ठिकाण -
दिनांक - / /

अपिलकाराची सही

दुसरे अपील.

६१० महाराष्ट्र शासन राजपत्र, असा., नोव्हेंबर १८, २००५/कार्तिक २७, शके १९२७ [भाग चार-अ

जोडपत्र "क"

[नियम ५ (२) पहा]

येथे २० रु. चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याच्या कलम १९(३) खालील अपील

प्रेषक ..........................................................................
(अपीलकाराचे नाव व पत्ता)

प्रति ..........................................................................

(१) अपीलकाराचे संपूर्ण नाव :

(२) पत्ता :

(३) राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा तपशील :

(४) पहिल्या अपील प्राधिकाऱ्याचा तपशील :

(५) ज्या आदेशाविरूद्ध अपील केले आहे तो आदेश मिळाल्याचा दिनांक. :

(६) अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक :

(७) अपिलाची कारणे :

(८) माहितीचा तपशील—
  (एक) हव्या असलेल्या माहितीचे स्वरूप आणि विषय :
  (दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नाव. :

ठिकाण :

दिनांक

अपीलकाराची सही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सत्यबीर एस. डोह,
शासनाचे प्रधान सचिव,

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम,२०१२.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००९/प्र.क्र.३९८/०९/सहा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ३१/५/ २०१२.

**शासन परिपत्रक** :-

माहिती अधिकारासंदर्भातील केंद्र शासनाचा " माहितीचा अधिकार अधिनियम, २००५" दिनांक १२/१०/२००५ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमांच्या अंमलबजावणीकरीता जरुरी असणारे नियम करण्याचे अधिकार कलम २७ (२) अन्वये राज्य शासनांना देण्यात आलेले आहेत. त्यानुसार, राज्य शासनाने महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ तयार केला असून हे नियम दिनांक १६/१/२०१२ च्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर शासन राजपत्राची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक 201206120635270100 असा आहे.

( ज्ञा.ल.सुळ )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव.
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
* महाप्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा).
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा).

* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधानमडळ सचिवालय, मुंबई.
* सचिव, राज्य निवडणुक आयोग, मुंबई.

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व महानगर पालिका आयुक्त.
सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुंबई
महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे.
सर्व मंत्रालयीन विभाग (अधिनस्त कार्यालयांच्या तसेच अधिनियमातील कलम २ (ज) मधील व्याख्येनुसार सार्वजनिक प्राधिकरणांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह)
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.

*पत्राने.

RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/SOUTH-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ३, अंक ६९] शुक्रवार, जानेवारी २०, २०१२/पौष ३०, शके १९३३ [पृष्ठे ३
किंमत : रुपये १४.००

**असाधारण क्रमांक ७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जानेवारी २०१२

## अधिसूचना

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.**

क्रमांक केमाअ. २००९/प्र.क्र. ३९८/०९/सहा.—माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या २७ कलम, पोट-कलमे (१) आणि (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम, २०१२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ याच्या नियम ३ नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" **३क. एक विनंती अर्ज केवळ एका विषयाशी संबंधित असणे.**—अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा आणि त्यात सर्वसाधारणपणे दीडशेपेक्षा अधिक शब्द नसावेत. अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयांची माहिती हवी असेल तर तो त्याकरिता स्वतंत्र अर्ज करील :

परंतु, एकापेक्षा अधिक विषयांशी संबंधित विनंती अर्ज केला असेल अशा प्रकरणी, जन माहिती अधिकारी, केवळ पहिल्या विषयाशी संबंधित विनंतीबद्दलच माहिती देईल आणि इतर प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र विनंती अर्ज करण्याचा सल्ला, अर्जदाराला देईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नंदकुमार जंत्रे,**
शासनाचे सचिव.

APPENDIX 1

# THE MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION RULES, 2005

**(W.e.f. 12-10-2005)**

**Notification No. RTI 2005/C.R. 315/05/5.**— In exercise of the powers conferred by sub-section (2) of section 27 of the Right to Information act, 2005 (22 of 2005), the Government of Maharashtra hereby makes the following rules, namely:—

**1. Short title and commencement**

(1) These rules may be called the Maharashtra Right to Information Rules, 2005.

(2) They shall come into force on the 12th October, 2005.

**2. Definitions**

In the rules, unless the context otherwise requires,—

(a) 'Act' means the Right to Information Act, 2005 (22 of 2005);

(b) 'Section' means section of the Act;

(c) Words and expressions used in these rules but not defined shall have the same meanings respectively, assigned to them, in the Act.

**3. Procedure for seeking information**

A request for obtaining information under sub-section (1) of Section 6 shall be made to the concerned State Public Information Officer on plain paper in the format given in Annexure "A" and shall be accompanied by an application fee of rupees ten by way of cash against proper receipt or by demand draft or banker's cheque payable to the public authority or by affixing a court fee stamp of rupees ten.

**4. Fees for information**

(1) For providing the information under sub-section (1) of Section 7, the fee shall be charged by way of cash against proper receipt or by demand draft or banker's cheque payable or by way of money order to the public authority, at the following rates, namely:—

| | |
|---|---|
| (A) (a) When the concerned Department has already fixed the price of some documents, maps, etc. | The price so fixed *plus* postal charges. |
| (b) When the information is readily available, either by way of photocopying, or by other way (copy) | (i) rupees two for each page (in A-4 or A-3 size paper) created or copied plus postal charges; or<br>(ii) actual charge or cost price of a copy in large size paper plus postal charges. |

(B) for inspection of records, no fee for the first hour; and a fee of rupees five for each fifteen minutes (or fraction thereof) thereafter:

**Provided** that no postal charges shall be charged if the applicant collects the information personally.

(2) For providing the information under sub-section (5) of Section 7, the fee shall be charged by way of cash against proper receipt or by demand draft or bankers cheque or by way of money order payable to the public authority at the following rates :—

(a) for information provided in diskette or floppy, rupees fifty per diskette or floppy *plus* Postal charges; and

(b) for information provided in printed from at the price fixed for such publication or rupees two per page of photocopy for extracts from the publication plus Postal charges:

**Provided** that no postal charges shall be charged if the applicant collects the information personally.

**5. Appeal**

(1) Any person who, does not receive a decision within the time specified in sub-section (1) or clause (a) of sub-section (3) of Section 7, or is aggrieved by an order of the State Public Information Officer may, within thirty days from the date of receipt of the order of the State Public Information Officer, prefer an appeal to the concerned appellate authority on plain paper in the format given in Annexure "B", which shall be

accompanied by an appeal fee of rupees twenty by way of cash against proper receipt or by demand draft or banker's cheque payable to the public authority or by affixing a court fee stamp of rupees twenty, with a copy of such order appealed against.

(2) Any person aggrieved by an order of the appellate authority under sub-section (1) of Section 19 may, within ninety days from the date of receipt of the order of the appellate authority, prefer a second appeal to the State Information Commission on plain paper in the format given in Annexure "C", which shall be accompanied by an appeal fee of rupees twenty by way of cash against proper receipt or by demand draft or banker's cheque payable to the State Information Commission or by affixing a court fee stamp of rupees twenty, with a copy of such order appeal against.

ANNEXURE "A"

(*See* rule 3)

Affix here court Fee Stamp of Rs. 10/-

**Format of application for obtaining information under the Right to Information Act, 2005**

To,

The State Public Information Officer,

(Name of the office with address)

(1) Full name of the applicant :

(2) Address :

(3) Particulars of information required :

(i) Subject matter of information.* :

(ii) The period to which the information relates* :

(iii) Description of the information required$ :

(iv) Whether information is required by post or in person :

(The actual postal charges shall be included in additional fees)

(v) In case by post (Ordinary, Registered or Speed) :

(4) Whether the applicant is below poverty line (if yes, attach the photo copy of the proof thereof). :

Place :

Date: Signature of the Applicant.

* Board category of the subject to be indicated (such as grant of Government land/Service matters/ Licenses, etc.)
# Relevant period for which information is required to be indicated.
§ Specific details of the information is required to be indicated.

Affix here court Fee Stamp of Rs. 20/-

ANNEXURE "B"

[*See* rule 5(1)]

**Appeal under Section 19(1) of the Right to Information Act, 2005**

From : ......................................................

(Appellant's name and address)

To : ......................................................

(Name/designation/address of the appellate authority)

(1) Full name of the Appellant :

(2) Address :

(3) Particulars of the State Public Information Officer :

(4) Date of receipt of the order appealed against (if order passed) :

(5) Last date for filing the appeal :

(6) The grounds for appeal :

(7) Particulars of information— :

(i) Nature and subject matter of the information required :

(ii) Name of the Office or Department to which the information relates :

Place :

Date: Signature of the Applicant.

Affix here court Fee Stamp of Rs. 10/-

ANNEXURE "C"

[*See* rule 5(2)]

**Second Appeal under section 19(3) of the Right to Information Act, 2005**

From : ......................................................

(Appellant's name and address)

To : ......................................................

(1) Full name of the Appellant :

(2) Address :

(3) Particulars of the State Public Information Officer :

(4) Particulars of the First Appellate Authority :

(5) Date of receipt of the order appealed against :

(6) Last date for filing the appeal :

(7) The grounds for appeal :

(8) Particulars of information— :

(i) Nature and subject matter of the information required :

(ii) Name of the Office or Department to which the information relates :

Place :

Date: Signature of the Applicant.

## THE MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION (AMENDMENT) RULES, 2012, DT. 16.1.2012

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 16th January 2012.

**NOTIFICATION**

**MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION RULES, 2005,**

**No. CRTI./2009/C.R.398/09/VI.**-In exercise of the powers conferred by sub-sections (1) and (2) of section 27 of the Right to Information Act, 2005 (22 of 2005), the Government of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Right to Information Rules, 2005, as follows, namely:-

**1.** These rules may be called the Maharashtra Right to Information (Amendment) Rules, 2012.

**2.** After rule 3 of the Maharashtra Right to Information Rules, 2005, the following rule shall be inserted, namely:-

"**3A. Request relate only to single subject matter** :- A request in writing for information under section 6 of the Act shall relate to one subject matter and it shall not ordinarily exceed one hundred and fifty words. If an applicant wishes to seek information on more than one subject matter, he shall make separate applications:

Provided that, in case the request made relates to more than one subject matter, the Public Information Officer may respond to the request relating to the first subject matter only and may advice the applicant to make a separate application for each of the other subject matters."

By order and in the name of the Governor of Maharashtra

NANDKUMAR JANTRE,
Secretary to Government

## THE MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION (2ND AMENDMENT) RULES, 2012, DT. 31.1.2012

**GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31ST January 2012.

**NOTIFICATION**

**MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION RULES, 2005,**

**No. CRTI. 2008/CR 356/VI.**-In exercise of the powers conferred by sub-section 27 of the Right to Information Act, 2005 (22 of 2005) and of all other powers enabling in this behalf, the Government of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Right to Information Rules, 2005, namely:-

(1) These rules may be called the Maharashtra Right to Information (2nd Amendment) Rules, 2012.

(2) After rule 3A of the Maharashtra Right to Information Rules, 2005, the following rules shall be added, namely:-

"3B. **Procedure for seeking inspection of record** :- If after having considered the application filed by the applicant for seeking inspection of record under sub-section (1) of section 6, the Public Information Officer find it appropriate, the applicant may be granted permission to inspect the record and if he grants such permission the Public Information Officer shall requisition the record desired by the applicant for perusal, from the concerned section of the Department and shall give the same to the applicant for inspection in his presence or in the presence of his authorised representative, during office hours. While inspecting such record, the applicant shall be allowed to use pencil only and the information desired by the applicant shall be noted by him by pencil only and if the applicant bring any writing instruments other than a pencil, he shall deposit the same with the Public Information Officer and, thereafter, he shall be allowed to inspect the record. The applicant shall not make any marking on the record by the pencil he is allowed to use during inspection".

By order and in the name of the Governor of Maharashtra

NANDKUMAR JANTRE,
Secretary to Government